महाराष्ट्र शासन
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, 17, डॉ.आंबेडकर रोड, पुणे 411 001

Web: www.jdhepune.in E-mail: jdhepune@gmail.com

क्र.पदोन्नती-२०२५/(2286079/२५)/पुणे विभाग दि.७.१०.२०२५

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
पुणे/अहिल्यानगर/नाशिक.

विषय : महाविद्यालयातील रिक्त असलेल्या पदावर पात्र उमेदवारांना पदोन्नती देण्याबाबत..
संदर्भ : अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व समूह विद्यापीठे शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे महाराष्ट्र यांचे दि.२१.८.२०२५ चे निवेदन.

उपरोक्त विषयाचे संदर्भात महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व समूह विद्यापीठे शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे यांनी महाविद्यालयतील रिक्त असलेल्या पदावर पात्र उमेदवारांना पद रिक्त असूनही पदोन्नती दिली जात नसून, संबंधितांना पदोन्नती देण्याबाबत या कार्यालयाकडे निवेदन सादर केलेले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली पदोन्नतीची पदे नियमानुसार भरणेबाबतची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 10-10-2025
18:42:55

**(डॉ.अशोक उबाळे)**

सह संचालक (उच्च शिक्षण)

पुणे विभाग, पुणे

प्रत:- अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व समूह विद्यापीठे शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे

श्रमिकसंघ अधिनियमान्वये नोंदणीकृत

**महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व समूह विद्यापीठे शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, पुणे महाराष्ट्र.**

* पत्ता : घर क्र. ४७७२, चक्रधर नगर उत्तर बाजु, पांगरी रोड, बीड – ४३१ १२२ *

**मेघराज पंडित**
अध्यक्ष

**विष्णू खोजे**
सरचिटणीस

Mob. 8329736291, 8237649711, 9422243721 E - mail - stateunionnts@gmail.com

जा. क्र. 60/2025 दिनांक : 21.08.202

प्रति,
**मा.सहसंचालक,**
उच्च शिक्षण, पूणे विभाग,
पूणे.

**विषय :- महाविद्यालयातील रिक्त असलेल्या पदावर पात्र उमेदवारांना पदोन्नती मिळणे बाबत.**

**मा.महोदय,**

वरिल विषयानुसार आपणांस विनंती करण्यात येते की, महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पदभरती गेली अनेक वर्षापासून बंद आहे व महाविद्यालयातील बरेचसे शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने बाहूतांश महाविद्यालयात पदे हे रिक्त आहेत. परंतू काही महाविद्यालयात पदे रिक्त असतांनाही पदोन्नतीचे लाभ पात्र शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लवकर मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी आहेत.

तरी आपल्या स्तरावरुन रिक्त असलेल्या पदावर पात्र उमेदवारांना नियमानूसार पदोन्नती देण्याबाबतचे आदेश पारित व्हावेत. अशी आपणांस विनंती.

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी)

मेघराज पंडीत.
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व
समूह विद्यापीठे शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना